# MARATHI LANGUAGE II

# STANDARD XI

## PATTERN FOR FIRST MID TERM (FIRST FORMATIVE)

### प्रथम सत्रमध्य परीक्षा

इयत्ता ःअकरावी विषय ःमराठी (द्वितीय भाषा ) गुणः २०

दिनांक ः एकूण पाने ः ०२ वेळ ः१ तास

सूचना ः १.शुद्धलेखनाचे नवीन नियम पाळावेत.

२.उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

प्र१ः खालीलपैकी कोणत्याही एकाचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. ०५

१. "त्यापेक्षा माझे लुगडे रंगवले असते तर नेसायला तरी उपयोगी पडले असते."

२. "मास्तर, मी न्हाई जायाचा आता त्या साळंत!"

प्र २ःखालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नांचे उत्तर ७ ते ८ओळींत लिहा. ०५

१.फादर स्टिफन्स यांनी मराठी भाषेची महती कशी गायिली आहे?

२.शंकर रामाणी यांनी कुळागराचे वर्णन कसे केले आहे?

प्र३. ः खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा. ०४

१. एक चिमणी उघडया खिडकीतून आत आली आणि टेबलावर बसली .

प्र. ४ ः 'आनंद उच्च माध्यमिक विद्यालय' पणजी आयोजित बक्षीस वितरण समारंभाची कार्यक्रमपत्रिका तयार करा. ०४

प्र.५ ः खालील उतारा वाचून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा. ०२

सध्याचा सरकारी वनमहोत्सव सुरू होण्यापूर्वी कितीतरी वर्षे आधी – १९०८ साली- रवींद्रनाथांनी वृक्षारोपणाची ही मोहीम सुरू केली आणि त्यांच्या शब्दांतच सांगायचे, तर ही 'मरू विजय' ची- म्हणजे वाळवंटावरच्या विजयाची- मोहीमच होती. ही मोहीम त्यांनी किती यशस्वी करून दाखवली याची साक्ष पटवीत आज शांतिनिकेतनात शेकडो झाडे उभी आहेत. रवींद्रनाथांच्या या वृक्षप्रेमात त्यांचे चिरंजीव रथींद्रनाथ यांची नुसती साथच नव्हती, तर वर्षे

उपवने उभी करण्याच्या शास्त्रतले ते एक फार नामांकित तज्ञ होते. वृक्षवेलींच्या सगळया खोडी, आवडीनिवडी, लहरी रथीबाबूंना बरोबर ठाऊक होत्या. “सा-या भारतीय वृक्षांचं मी इथं कायमचं संमेलन भरवून ठेवीन” अशी प्रतिज्ञा केल्यासारखे त्यांनी शांतिनिकेतनाचे तपोवन उभे केले आहे, इतकेच नव्हे, तर फुलझाडाना लागर्णाया कुंडयदेखील स्वतः त्यांचे ‘डिझाइन’ करून, आकार देऊन, स्वतः भट्टीत घालून इतक्या विविध आणि सुंदर आकारांत घडवल्या आहेत, की एखादया बंगल्याच्या मालकाला आपल्या बंगल्याचा अभिमान वाटावा तसा त्या रोपांना आपल्यासाठी घडवलेल्या त्या कुंडयांचा वाटत असेल. ‘उत्तरायण’ बंगल्याच्या परिसरात त्यांनी निर्माण केलेल्या बागेतून- अशोकवनातून- निरनिराळया वृक्षांच्या वीथिकांतून हिंडताना माणूस नकळत अंतर्मुख होतो.

____ पु.ल. देशपांडे (पु. ल.एक परिचय : संपादक- जयवंत दळवी)

प्रश्न :१ : वृक्षारोपणाच्या मोहिमेचा कोणता अर्थ रवींद्रनथांनी सांगितला आहे ? (०१)

:२ : उता-याला योग्य शीर्षक लिहा . (०१)

- प्र १. मध्ये पाठांवर संदर्भ विचारल्यास प्र.२ मध्ये कवितांवर प्रश्नच विचारावा.
- प्र २.जर पाठांवर आधारीत असेल तर प्र.१.मधील संदर्भ कवितांवरच विचारावा.
- पाठ आणि कवितांवरचे प्रश्न एकत्र विचारू नयेत.तसेच पाठांवरच्या प्रश्नाना कवितांचे वा कवितांच्या प्रश्नांना पाठांचे पर्याय देऊ नयेत.
- प्र ३ मध्ये चार अधोरेखीत शब्द हवेत.
- प्र ५ मध्ये शीर्षकाचा प्रश्न अत्यावश्यक.